पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/कावि / ७१ /२०१८
दि. २९/११/२०१८

प्रति,
मा.----------------------------
सदस्य/सदस्या क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नेहरुनगर,भोसरी-२६.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ५/१२/२०१८ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ५/१२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक- १९**

दिनांक- ५/१२/२०१८ वेळ- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ५/१२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दिनांक ३/११/२०१८ व दि.५/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१८ ) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक-१) **मा.राजेंद्र लांडगे व मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव-** भगतवस्ती,गुळवेवस्ती,शांतीनगर,धावडेवस्ती याठिकाणी पाणीपुरवठा अपुरा व विस्कळीत होत आहे.याठिकाणी मोठया प्रमाणात पाण्याची समस्या भेडसावत आहे.अपुरा पाणी पुरवठा होत असल्याची नागरीकांची वारंवार तक्रार येत असल्याने याठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी खुला प्लॉट क्र.४ पेठ क्र.१ नाथसाहेब फ्लॉवर मिल समोर याठिकाणी २५ ते ३० गुंठा जागेवर नवीन टाकी बांधण्यात यावी (जेणेकरुन भगतवस्ती,गुळवेवस्ती,शांतीनगर,धावडेवस्ती नागरीकांची पाण्याची समस्या दूर होईल व पाणीपुरवठा सुरळीत होईल.)

विषय क्रमांक-२) **मा.अश्विनी जाधव व मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव**- प्रभाग क्रमांक २ मधील चिखली बो-हाडेवाडी मोशी शिवेवरील शिव रस्ता त्याला छेदून जाणारा ३० मीटर रस्ता पुणे-नाशिक रोड ते कुदळवाडी या दोन रस्त्याने तयार होणा-या चौकास **"बोल्हाईमाता चौक"** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक -३) **मा.विक्रांत विलास लांडे यांचा प्रस्ताव-** पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मधील इंद्रायणीनगर परीसरातील नुतन भाजी मंडईला **"संत तुकाराम महाराज भाजी मंडई"** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-४) **मा.समीर मोरेश्वर मासुळकर व मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव**- स्थापत्य विभागाने "क" प्रभागाने मासुळकर कॉलनी येथे मासुळकर कॉलनी सुरक्षा केबीन बांधुन पुर्ण करणेत आलेली आहे.पिं.चि.शहरात राज्य शासनाच्या धोरणानुसार नवीन पोलिस आयुक्तालय निर्माण करुन कार्यान्वीत झाले

आहे.सदर आयुक्तालयास मोठया प्रमाणात वास्तुची वेगवेगळया विभागासाठी आवश्यकता आहे. सदर मासुळकर कॉलनी सुरक्षा केबीनची मा.पोलिस आयुक्त यांचे अधिकारी व स्थानिक नगरसदस्य मा.समीर मासुळकर यांनी पहाणी केली आहे.सदरची वास्तु पोलिस चौकीसाठी योग्य असलेचे सांगितले या बाबीचा व मा.महापालिका सभा क्र.३२ ठराव क्रमांक ५४५ दि.०५/०८/२०१४ रोजी सदर ठिकाणी पोलिस चौकी बांधणेबाबत ठराव मान्य केलेला आहे.

उपरोक्त बाबींचा सारासार विचार करता,स्थानिक नागरीक,नगरसदस्य व मा.महापालिका सभा ठरावानुसार सदरच्या वास्तूस **"मासुळकर कॉलनी पोलिस चौकी"** असे नामकरण करणेस तसेच सदरची वास्तु मा.पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर यांस नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतर करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव (सभाशाखा)**
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/सभा/कावि/७१ /२०१८
दि. २९/११ /२०१८